जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 OCT 2026

तरुण भारत

विद्यापीठाच्या हस्तक्षेपाने विद्यार्थीनीला दिलासा

त. भा. प्रतिनिधी

- महाविद्यालयाच्या चुकीमुळे निर्माण झाली होती समस्या

कोल्हापूर : महाविद्यालयीन स्तरावरील चुकीमुळे शैक्षणिक अडचणीत सापडलेल्या एका गुणवंत विद्यार्थिनीला शिवाजी विद्यापीठाच्या हस्तक्षेपामुळे दिलासा मिळाला आहे. विद्यार्थिनीची कोणतीही चूक नसल्याचे स्पष्ट झाल्यानंतर तिचे शैक्षणिक वर्ष वाचविण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात आली.

कसबा बीड (ता. करवीर) परिसरातील एका महाविद्यालयात हा प्रकार घडला होता. महाविद्यालयीन स्तरावरील चुकीमुळे या विद्यार्थिनीला बी.एस्सी.च्या भाग एकमध्ये शिक्षण घेताना मोठ्या अडचणीचा सामना करावा लागला. तिचे शैक्षणिक वर्ष वाया जाण्याची शक्यता होती. या प्रकरणात विद्यार्थिनीची कोणतीही चूक नसल्याचे स्पष्ट झाल्यानंतर तिला विशेष परीक्षा देण्याची संधी मिळावी, यासाठी प्रयत्न करण्यात आले. विद्यार्थिनीच्या पालकांनी व्यवस्थापन परिषद सदस्य ॲड. स्वागत परुळेकर यांच्याकडे दाद मागितली. त्यांनी प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत संबंधित विद्यार्थिनीची बाजू विद्यापीठ प्रशासन आणि परीक्षा मंडळासमोर मांडली. विद्यार्थिनीचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, तसेच तिला पुढील शिक्षणाची संधी मिळावी, यासाठी ॲड. स्वागत परुळेकर यांनी पाठपुरावा केला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 OCT 2026

पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय महिला हॉकी स्पर्धेत विजेतेपद पटकाविणारा गडहिंग्लजच्या घाळी महाविद्यालयाचा संघ. सोबत मान्यवर, संयोजक आदी.

घाळी महाविद्यालय गडहिंग्लज विजेता

शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय महिला हॉकी स्पर्धा

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय महिला हॉकी स्पर्धेत गडहिंग्लजच्या घाळी महाविद्यालयाने विजेतेपद पटकाविले. संजीवन ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट पन्हाळा आयोजित ही स्पर्धा महापालिकेच्या मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियमवर झाली.

स्पर्धेच्या पहिल्या उपांत्य सामन्यात विवेकानंद कॉलेजने बळवंत कॉलेज विटा संघाचा ४-०, तर दुसऱ्या उपांत्य सामन्यात घाळी महाविद्यालयाने गव्हर्न्मेंट कॉलेज कराड संघाचा ३-० गोलने पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम सामना विवेकानंद कॉलेज कोल्हापूर विरुद्ध घाळी महाविद्यालय यांच्यात पूर्ण वेळेत गोलशून्य बरोबरीत राहिला. टायब्रेकरमध्ये घाळी महाविद्यालयाने ३-२ असा विजय मिळवला. तिसऱ्या क्रमांकाच्या सामन्यात बळवंत कॉलेज विटा संघाने गव्हर्न्मेंट कॉलेज कराडवर २-१ अशी मात केली.

बक्षीस समारंभ जिल्हा हॉकी संघटनेचे अध्यक्ष विजय साळोखे-सरदार, अनिल परांडेकर, अनिल शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी सागर जाधव, नझीर मुल्ला, विकास जाधव, संतोष जाधव, लीना पाटील आदी उपस्थित होते. संयोजन रणजित इंगवले, गणेश पोवार व प्रमोद काळे यांनी केले. पंच म्हणून योगेश देशपांडे, विश्वजित मेंगाने, प्रणव चौगले, कृष्णा भोसले यांनी काम पाहिले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 OCT 2026

लोकसत्ता

सर्व अभ्यासक्रमांच्या सीईटी पुढील वर्षापासून दोन वेळा

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांची माहिती

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : यंदा अभियांत्रिकी, वैद्यकीय व व्यवस्थापन अभ्यासक्रमांसाठी दोनदा सीईटी घेण्यात आली होती. राज्यातील १४ लाखांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना याचा फायदा झाला. ही बाब लक्षात घेत आता सर्वच अभ्यासक्रमांच्या सीईटी दोन वेळा घेण्यात येणार असल्याची माहिती उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.

सध्या विविध अभ्यासक्रमांसाठी सीईटी कक्षाकडून एकूण १९ सीईटी घेतल्या जातात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठातील कार्यक्रमानंतर याबाबत माहिती देताना मंत्री पाटील यांनी सांगितले की, व्यावसायिक, तांत्रिक, आणि वैद्यकीय अभ्यासक्रमांशिवाय उच्च शिक्षणातील विधि, बीएड अशा अभ्यासक्रमांसाठीही आता दोन सीईटी होणार आहेत.

पंधरवड्यात कार्यपद्धती

सीईटी परीक्षा कशा घेतल्या जाव्यात, याबाबतची कार्यपद्धती सीईटी कक्षाकडून तयार केली जात आहे. येत्या १५ दिवसांत ती पूर्ण होईल. यात परीक्षा केंद्रे, परीक्षा घेण्याची पद्धत, त्यासाठीची नियमावली, तपासणी यंत्रणा यांचा समावेश असेल, असेही मंत्री चंद्रकांत पाटील यांनी स्पष्ट केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 OCT 2026
सकाळ

विद्यापीठात वाल्मीकी जयंती

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आज महर्षी वाल्मीकी जयंती साजरी करण्यात आली. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव आणि कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते मुख्य इमारतीत महर्षी वाल्मीकी यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. आसावरी जाधव, डॉ. सोनल चोंदे, स्मिता पोरे, संभाजी परीट, कृष्णात पोवार उपस्थित होते.

जनरीपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 OCT 2026

लोकमत

दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांना दिलासा; मदतीसाठी कधीही फोन करा!

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर उच्चशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कमाफीसह इतर कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी सरकारने विद्यापीठ स्तरावर टास्कफोर्स आदी उपाययोजना केल्या आहेत.

त्याच्या अंमलबजावणीसाठी विद्यापीठांचे परीक्षा नियंत्रक तसेच विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक यांचे मोबाइल क्रमांक सार्वजनिक केले आहेत. यंदा दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाल्याने राज्य सरकारने दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफी दिली आहे. शिवाय, विद्यार्थ्यांच्या अडचणींचे जागेवरच निवारण करण्यासाठी प्रत्येक स्वतंत्र टास्कफोर्स काम करत आहे. या सवलतीचा २६ विद्यापीठांमधील दोन लाख ४० हजार विद्यार्थ्यांना आतापर्यंत लाभ मिळाला आहे. विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची शुल्कमाफी होणार असून महाविद्यालयांचे प्रस्ताव येण्याची प्रक्रिया सुरु आहे.



एआय इमेज

"दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना शुल्कमाफी देण्यात आली असून काही महाविद्यालयांचे प्रस्ताव प्राप्त झाले असून काही महाविद्यालयांचे प्रस्ताव येणे बाकी आहे. त्यावर कार्यवाही सुरू आहे.

डॉ. अजितसिंह जाधव, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

झिरो चलान, फीस परतावाचीही सुविधा

परीक्षा अर्ज भरताना विद्यार्थ्यांकडून शुल्क न घेण्यासाठी 'झिरो चलन' सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मदत व पुनर्वसन विभागाने २५ सप्टेंबरला काढलेल्या शासन निर्णयानंतर राज्यातील दुष्काळग्रस्त तालुक्यांची संख्या २६५ या तालुक्यांतील विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क घेऊ नये, असा निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभागाने घेतला. या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी विभागाने नियमित बैठका घेतल्या. संचालनालय, विद्यापीठ आणि परीक्षा संचालक या तीन स्तरांवर समन्वयाची सर्व विद्यापीठांनी परीक्षा शुल्कमाफीबाबत परिपत्रक काढली आहेत. ज्या विद्यार्थ्यांकडून शुल्क आधीच वसूल करण्यात आले होते, त्यांना ते परत करण्याची प्रक्रिया सुरू

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 OCT 2026
लोकमत

विद्यापीठात महर्षी वाल्मिकी जयंती

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सोमवारी महर्षी वाल्मिकी जयंती साजरी करण्यात आली. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव आणि कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये महर्षी वाल्मिकी यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. आसावरी जाधव, डॉ. सोनल चोंदे, डॉ. स्मिता पोरे, संभाजी परीट, कृष्णात पोवार उपस्थित होते.